# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-२६४७८७९५/ ५३१/ २९६/ २६४७०९१६ (वै.) फॅक्स : ०२२-२६४७३९७९

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्र.मरातंशिमं/का-४०/परीक्षा-२०२०/९४

दिनांक 10 JUN 2020

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व संस्था व
सर्व स्वायत्त तंत्रनिकेतने,

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील उन्हाळी सुट्टीबाबत...**

संदर्भ :- १) मा. संचालक तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/२०२०/वेळापत्रक नियोजन/२७४, दि. १२.०५.२०२०.

२) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-२०/परीक्षा-२०२०/८३, दि. १५.०५.२०२०

३) मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र.मरातंशिमं/का-१०/परीक्षा-२०२०/८४, दि. १५.०५.२०२०

४) मा. संचालक तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/२०२०/उन्हाळी सुट्टी/३६५, दि. ०९.०६.२०२०.

कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने मंडळाने विद्वत समितीची बैठक आयोजित केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी व निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाशी संग्लनित सर्व संस्थांना संदर्भ क्र. २ अन्वये परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाच्या नियोजनाबाबत ठळक बाबी कळविण्यात आलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये स्वायत्त संस्थांना मंडळाने संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन स्वायत्त संस्थेच्या परीक्षा, मंडळाच्या परीक्षेच्या धोरणाशी सुसंगत राहतील याबाबतची दक्षता घेण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

राज्य शासनाच्या गठीत समितीने प्रत्येक विद्यापीठास उन्हाळी सुट्टीचे नियोजन त्यांच्या स्तरावर करण्याची शिफारस केलेली आहे. तसेच संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाने उन्हाळी सुट्टी घोषित करण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुषंगाने पदविका संस्थाकरीता उन्हाळी सुट्टीचे नियोजन मंडळामार्फत करण्यात येत आहे. त्यास अनुसरुन सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना **दि. ०५.०५.२०२० ते १३.०६.२०२०** या कालावधीत ४० दिवस उन्हाळी सुट्टी देण्यात यावी. संस्थेतील परीक्षांचे नियोजन किंवा इतर शैक्षणिक कामाकरिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवा आवश्यक असल्यास त्यांना थोपविण्यात यावे, जेणेकरुन संस्थेतील कामे सुरळीपणे पार पाडतील व त्यामध्ये कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीसाठी –

१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.
३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.